# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः31.07.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

• भारत जगासाठी विकास आणि स्थिरतेचा मार्गदर्शक, राहणीमान सुलभता, कौशल्य विकास आणि रोजगारावर सरकारचा भर- पंतप्रधान नरेंद्र मोदी

• केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलनात 135 मृत्यूमुखी, अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती.

• पॅरीस ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरचं दुसरं पदक, सरबजोत सिंगसह कास्य पदकाला गवसणी, तर भारतीय हॉकी संघाची विजयी घौडदौड कायम आणि

• देशाच्या बहुतांश भागात अतिवृष्टीचा इशारा, महाराष्ट्रात पुणे, सांगली, कोल्हापुरात धरणांमधून विसर्ग सुरू, नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा.

**पंतप्रधान**

देशवासियांची राहणीमान सुलभता, कौशल्य विकास आणि रोजगार यावर केंद्र सरकारनं लक्ष केंद्रित केल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. दिल्लीत काल आयोजित केलेल्या विकसित भारताच्या दिशेने प्रवास- केंद्रीय अर्थसंकल्प 2024-25 नंतरच्या परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना मोदी बोलत होते. देशात रोजगाराला चालना देणाऱ्या सूक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योगांकडे विशेष लक्ष देण्याचं आश्वासन देऊन, सरकार नागरिकांना राहणीमानातली सुलभता आणि गुणवत्तापूर्ण जीवन देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. देशाचा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर आठ टक्क्यांपर्यंत पोचत असून, भारत जागतिक पातळीवरील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था होण्याचे दिवस फार दूर नसल्याचं मोदी म्हणाले. मोदी पुढे म्हणाले की, जगासाठी भारत हा विकास आणि स्थिरतेचा मार्गदर्शक ठरत असून सरकार ज्या वेगाने पायाभूत संरचना

सुविधांची उभारणी करतो आहे, ती अभूतपूर्व आहे. भारताची धोरणं, समर्पण, दृढनिश्चय आणि निर्णय क्षमता, जगभरातून परदेशी गुंतवणूक आकर्षित करत आहे.

**उत्पादन परवाना**

केंद्र सरकारने 14 क्षेत्रातल्या 755 अर्जांना उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत मान्यता देत त्यायोगे 8 लाख रोजगाराची निर्मिती करून एक कोटी 23 लाख रुपये प्राप्त केले आहेत. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग राज्य मंत्री जितीन प्रसाद यांनी लोकसभेत लेखी उत्तरामध्ये काल ही माहिती दिली. सरकारनं देशाची उत्पादन क्षमता आणि निर्यात वाढवण्यासाठी या योजनेअंतर्गत एक लाख 97 हजार कोटी रुपये खर्चाचा आराखडा जाहीर केला होता. या योजनांचा उद्देश हा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक आकर्षित करणं आणि कार्यक्षमता सुनिश्चित करणे, तसंच उत्पादन क्षेत्रात आकार आणि प्रमाण यांच्यातील अर्थव्यवस्था आणण्याचा असल्याचंही प्रसाद यांनी नमूद केलं आहे.

**राष्ट्रीय-प्रशिक्षण-योजना**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते काल शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणासाठीच्या राष्ट्रीय परिवीक्षा आणि प्रशिक्षण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या नॅटस् २.० पोर्ट लचे उद्घाटन करण्यात आलं. तसंच शिकाऊ उमेदवारांसाठी 100 कोटी रुपयांचा भत्ता थेट खात्यात हस्तांतरीत करण्यात आला. हे प्रशिक्षणार्थी, माहिती तंत्रज्ञान, उत्पादन, स्वयंचलित वाहने आणि इतर क्षेत्रात शिकत आहेत. तरूणांच्या कौशल्य आणि रोजगार क्षमतेवर लक्ष केंद्रीत करण्याच्या केंद्रा सरकारच्या धोरणाशी हा पुढाकार निगडीत आहे.
याप्रसंगी बोलताना प्रधान म्हणाले की, नॅटस् पोर्टल हे शिकाऊ प्रशिक्षणाचे लोकशाही करण, कौशल्यातलं अंतर भरून काढणे, तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करत त्यांना भविष्यासाठी तयार करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. या पोर्टलमुळे शिकण्याच्या संधींचा आवाका वाढेल आणि उमेदवार- रोजगार प्रदाता यांच्यात जुळवून घेण्यास मदत होणार आहे. यामध्ये प्रशिक्षणार्थी व्यवस्थेत विविध उदयोन्मुख क्षेत्रांचा समावेश असावा असेही प्रधान म्हणाले. देशातल्या लोक संख्याशास्त्रीय लाभांशाचा उपयोग करून घेण्यासाठी सर्व हितासंबंधी भागीदारांनी सर्वसमावेशक धोरण आखण्याचे तसंच सर्व शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना या पोर्टल मध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येत्या शुक्रवारी होणाऱ्या राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचे अध्यक्षपद भूषणावर आहेत. राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली होणारी पहिलीच परिषद आहे. राष्ट्रपती सचिवालयांन दिलेल्या माहितीनुसार सर्व राज्यांचे राज्यपाल परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**व्हिएतनाम**

व्हिएतनामचे पंतप्रधान फाम चिन्ह तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. त्यांच्या समवेत असलेल्या शिष्टमंडळात अनेक मंत्री, उपमंत्री आणि व्यापारी नेत्यांचा समावेश आहे. त्यांच्या या भेटीमुळे दोन्ही देशांमधील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रण धीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचीही भेट घेणार आहेत.  भारत आणि व्हिएतनाम यांच्यात दीर्घकालीन ऐतिहासिक संबंध असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटी दरम्यान त्याना धोरणात्मक भागीदारीचं स्वरूप देण्यात आलं होतं.

**वायनाड**

केरळमध्ये वायनाड जिल्ह्यात काल झालेल्या भू स्खलनातल्या मृतांची संख्या 135 वर पोचली असून ती आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. परिसरातल्या विविध रुग्णालयांमध्ये 186 जखमेवर उपचार सुरू असून सुमारे 200 नागरिक बेपत्ता आहेत तर दीडशे लोकांना बाधित भागातून सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे.  या भागात लष्कर आणि नौदलाच्या जवानांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. केरळमध्ये आजपर्यंत राजकीय दुखवटा जाहीर करण्यात आल्याचं आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वायनाड मध्ये झालेल्या जीवितहानी बद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान, जिल्ह्यात 45 मदत शिबिरं सुरू करण्यात आली असून त्यामध्ये 3069 लोकांची राहाण्याची व्यवस्था करण्यात आली. केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज वायनाडला भेट देणार आहेत.

**क्रिकेट-प्रशांत**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील वीस षटकांच्या तीन सामन्यांच्या
मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना भारताने सुपर ओव्हर मध्ये जिंकला. या विजयामुळे भारताने ही मालिका 3-0 अशी जिंकली. सुपर ओव्हर मध्ये श्रीलंका केवळ 2 धावा करू शकली तर सुर्यकुमार

यादवने पहिल्याच चेंडूवर मारलेल्या चौकाराने भारताने सामना सहज जिंकला. तत्पूर्वी नियमित सामन्यात भारताने 137 धावा केल्या तर एकवेळ 2 बाद 110 अशी मजबूत स्थिती असलेल्या श्रीलंकेनेदेखील तेवढ्याच धावा केल्याने सामना सुपरओव्हर मध्ये खेळवला गेला.

**ऑलिंपिक्स**

पॅरीस ऑलिम्पिक स्पर्धेत मंगळवारी भारतीय नेम बाज मनू भाकर आणि सरबजोत सिंग जोडीन दहा मीटर एअर पिस्तुल मिश्र प्रकारात कास्य पदकाला गवसणी घातली. त्यांनी दक्षिण कोरियाच्या ओह ये जिन आणि ली वोनहो यांचा 16-10 असा पराभव केला.

स्वातंत्र्यात काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच ऑलिंपिकमधे दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. आज स्पर्धेच्या पाचव्या दिवशी भारतीय खेळाडू मुष्टियुद्ध, तिरंदाजी नेमबाजी आणि बॅडमिंटन चे सामने खेळणार आहेत. नेम बाजीत, ऐश्वरी प्रताप सिंग तोमर पुरुषांच्या 50 मीटर रायफल 3 पोझिशन्स पात्रता स्पर्धेत भाग घेणार आहे. तर महिला ट्रॅप नेमबाजी पात्रतेच्या पहिल्या दिवशी 68 गुण मिळवणाऱ्या श्रेयसी सिंग आणि राजेश्वरी कुमारी पात्रता फेरीच्या दुसऱ्या दिवशी आज पुन्हा मैदानात उतरतील. बॅडमिंटन च्या पुरुष एकेरीत लक्ष्य सेनची लढत इंडोनेशियाच्या जोनाथ न क्रिस्टीशी तर एच एस प्रणॉयची लढत व्हिएतनामच्या डच फाट लीशी होणार आहे. महिला एकेरीत पीव्ही सिंधूची लढत एस्टोनियाच्या क्रिस्टिन कुउबाशी होणार आहे.

**पाऊस**

तामिळनाडू, पुडुचेरी, कराई कल, केरळ, आणि दक्षिण कर्नाटकात तसंच उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदीगड, पश्चिम उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश राज्यांत उद्या अतिवृष्टीचा अंदाज भारतीय हवामान विभागानं  वर्तवला आहे. येत्या 4 ते 5 दिवसांत मान्सून हळूहळू उत्तरेकडे सरकेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. र, महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. पुण्यात सकाळपासून पावसाच्या सरी कोसळत आहेत. सखल भागांमध्ये पाणी भरू लागलं आहे. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा विसर्ग वाढवण्यात आला आहे. तर सांगली जिल्ह्यात धरणांच्या क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असल्याने, कोयना आणि इतर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दोन्ही जिल्ह्यातल्या नदीकाठच्या लोकांनी सावध राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनानं आणि पाटबंधारे विभागानं केलं आहे.

कोल्हापुरात काल रात्रीपासून पाऊस पुन्हा सुरू झाल्यामुळं राधानगरी धरणाचे सातही दरवाजे पुन्हा उघडले आहेत. तुळशी धरणातूनही विसर्गात वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळं नद्यांना पूर येण्याची शक्यता आहे.

**पुणे केंद्रावरील राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार**